# पोलीस अधीक्षक कार्यालय,सातारा
# आर्थिक गुन्हे शाखा,सातारा
# तर्फे
# सातारा जिल्हयातील नागरीकांना जाहीर आवाहन

सर्व जनतेस पोलीस उपअधीक्षक कार्यालय, आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांचेकडून अवाहन जाहीर करण्यात येते की, सातारा जिल्हयामध्ये शेअर्स मार्केट, क्रिप्टो करन्सी, पैसे दामदुप्पट करणे, फसव्या स्कीम, कमी कालावधी मध्ये ज्यादा पैश्याचा पतावा अशा वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात आर्थिक लाभ देण्याचे आमिष दाखवून याद्वारे शहरासह ग्रामिण भागात मोठया प्रमाणावर आर्थिक फसवणूकीच्या घटना उघडकीस येत आहेत. यामध्ये सामान्य नागरिक/ सेवानिवृत्त शासकीय/ खाजगी व्यक्तींना गुंतवणूकीच्या नावाखाली मोठया प्रमाणात लाभ देण्याचे आमिष दाखवून यामधून कमीशन, भेटवस्तू, देश-विदेश ट्रिपच्या माध्यमातून लोंकाकडून मोठया प्रमाणात पैसे, कॅश/ बँक खातेवर गुंतवणूक करुन घेऊन त्यानंतर साखळी पद्धत राबवून यातून सुरवातीचे काही मिहीने परतावे देण्यात येतात व त्यानंतर खोटी कारणे सांगून परतावे देणे बंद करुन सामान्य नागरीकांची सर्रासपणे फसवणुक होत आहे. सातारा जिल्हयात अशा पद्धतीचे मोठ्या प्रमाणात असे गंभीर गुन्हे ही दाखल होत आहेत.

अशा प्रकारे फसवणूक टाळणेसाठी नागरीकांनी अशा कोणत्याही संशयास्पद योजना मधील भुलथापांना बळी पडू नये, यामधूनच तुमची आर्थिक फसवणूक होऊ शकते, असे आवहान मा.पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख यांनी केले आहे. याद्वारे सातारा जिल्हयातील नागरीकांना आवहान करण्यात येते की, सोशल मिडीयावर किंवा ईमेल द्वारे प्राप्त झालेल्या कोणत्याही खोटया जाहिरातीला (आमिषाला) बळी पडू नका, तसेच व्हॉट्सॲप, फेसबूक वर अशा लिंक कोणालाही शेअर करु नका, अशा प्रकारच्या फसव्या लिंक किंवा मेसेजला बळी पडू नका, आधी अशा जाहिरातींची सत्यता पडताळून घ्यावी.

अनोळखी ॲप मोबाईल मध्ये डाऊनलोड करु नका,अनोळखी व्यक्तींच्या कॉलवर आपल्या बँक खात्यासंबधी तसेच आपली वैयक्तीक माहिती देऊ नका, तुमची एक चुकीची क्लिक तुमचे बँक खाते खाली करु शकते, तसेच तुमचा लोभ तुमचा परिवार उद्‌ध्वस्त करु शकतो.

**तरी खालील गोष्टींवर बारकाईने लक्ष देवून आपली फसवणूक होणार नाही यापासून दक्षता घेणेसाठी जाहिर आवहान करण्यात येते**

*पैसे दुप्पट करणे, वेगवेगळया प्रकारे आमिष दाखवून पैसे जमा करण्याच्या फसव्या स्किमद्वारे आमिष दाखवून फसवणूक केली जाते

*क्रिप्टो करन्सी, भारतीय शेअर्स मार्केट माध्यमातून दरमहा ठरावीक टक्के फिक्स परतावा मिळेल असे आमिष दाखवून फसवणूक केली जाते.

*विविध सरकारी खात्यामध्ये अगर खाजगी (परदेशी) कंपन्यामध्ये मोठया पगाराची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून लोकांची आर्थिक फसवणूक केली जाते.

*विविध कारणासाठी कर्ज मिळवून देतो असे आमिष दाखवून फसवणूक केली जाते.
*मोबाईलवर मेसेज पाठवून मोठया रक्कमेची लॉटरी लागल्याचे सांगून बँक खात्याची सर्व माहिती घेवून बक्षीसाची रक्कम घेणेकरीता बँकेत पैसे पुन्हा पुन्हा भरावयास सांगून फसवणूक केली जाते.
*मोबाईल कंपन्याचे टॉवर बसवून भाडेतत्वावर जागा घवून व दर महिन्याला मोठा आर्थिक फायदा होईल असे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देवून तसेच लोकांना मोबाईल कंपन्यांचे नावाचे लोगो असलेले खोटे पत्र दाखवून लोकांचे कडून प्रोसेसींग फी म्हणुन काही रक्कम दिलेल्या आकाऊंट नंबरवर भरणेस सांगून आर्थिक फसवणूक केली जाते.

तरी कोणत्याही प्रकारे अविचाराने आर्थिक व्यवहार करु नये तसेच आर्थिक फसवणूक होवू नये याकरीता नागरीकांनी कोणत्याही आमिषाला / प्रलोभनाला बळी पडू नये तसेच संबधीतांना कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देवू नये, अशा प्रकारच्या फसव्या योजनांची माहिती मिळाल्यास तात्काळ आर्थिक गुन्हे शाखा,सातारा, पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा तसेच जवळील पोलीस ठाणेशी संपर्क साधून माहिती द्यावी असे आवहान करण्यात येत आहे.


तुषार दोषी(भा.पो.से)
पोलीस अधीक्षक,सातारा

डॉ. वैशाली कडूकर
अपर पोलीस अधीक्षक,सातारा

आश्लेषा हुले
पोलीस उपअधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा,सातारा.
संपर्क-९२२३००६११९
९२२३००६१२०